शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनेस्नहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श


संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## इंधन व गॅस तुटवड्यावर बांबू हाच शाश्वत पर्याय - डॉ. सुयोग कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी** - सध्या सुरू असलेले इराण, इस्रायल-अमेरिका यांच्यातील युद्धजन्य संकट केवळ राजकीय नसून त्याचे भयंकर दुष्परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर आणि प्रामुख्याने ऊर्जा व उद्योग क्षेत्रावर होत आहेत. या युद्धामुळे एलपीजी गॅस आणि इंधनाचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, येणाऱ्या काळात याचे गंभीर सावट उद्योगांवर पडणार आहे. या संकटातून देशाला वाचवण्यासाठी बांबू हाच एकमेव आणि शाश्वत पर्याय असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची पूर्ती त्यातच सामावलेली आहे, अशा शब्दात बांबू लागवड चळवळीचे जालना जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी या सद्यपरिस्थितीवर उपाय मांडला आहे.

सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. गॅससाठी रांगा लागत असून इंधनाचे दर गगनाला भिडत आहेत. या परिस्थितीवर तात्पुरती मात करण्यासाठी एलपीजी गॅससाठी घरगुती वापराला प्राधान्य, त्यानंतर फर्टीलायझर आणि शिल्लक असेल तरच उद्योगांना गॅसचा पुरवठा होईल. याचा सर्वाधिक फटका स्टील कंपन्या आणि मोठ्या उद्योगांना बसत आहे. अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. यावर भाष्य करताना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, गरज ही शोधाची जननी आहे. आजची परिस्थिती पाहता आपल्याला इंधनासाठी इतर देशांवर अवलंबून राहणे परवडणारे नाही. अशा वेळी बांबू हे शाश्वत इंधन म्हणून समोर आलेले असून या संधीचा वापर करणे गरजेचे आहे.






बांबूपासून इथेनॉल आणि एलपीजी निर्मिती : बांबूचा वापर केवळ शोभेच्या वस्तू किंवा बांधकामासाठी मर्यादित न राहता, त्यातून ऊर्जा निर्मिती शक्य आहे. बांबूपासून उच्च दर्जाच्या इथेनॉलची निर्मिती होऊ शकते, जे पेट्रोलला उत्तम पर्याय ठरेल. योग्य संशोधन आणि प्रक्रियेद्वारे बांबूपासून गॅस निर्मिती करून तो एलपीजीला पर्याय म्हणून वापरता येऊ शकतो. जर उद्योजकांनी बांबू इंधनाचा स्वीकार केला, तर इंधन आयातीवर होणारा खर्च शून्यावर येईल, असे डॉ. कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

आत्मनिर्भर भारतासाठी महत्त्वाचे पाऊल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत ही संकल्पना मांडली आहे. डॉ. कुलकर्णी यांच्या मते, जोपर्यंत भारत ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होत नाही, तोपर्यंत पूर्ण आत्मनिर्भरता येणे कठीण आहे. बांबूच्या माध्यमातून आपण इंधन आयात करणे थांबवू शकतो, ज्यामुळे देशाचे कोट्यवधी रुपये वाचतील आणि भारत जगाला ऊर्जेचा नवा मार्ग दाखवू शकेल.

शासनाचे सकारात्मक धोरण : राज्य आणि केंद्र सरकारनेही बांबू लागवडीला आणि उद्योगाला प्रोत्साहन दिले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या बजेटमध्ये उद्योग धोरणांतर्गत ५० हजार कोटींच्या गुंतवणुकीची तरतूद करण्यात आली आहे. या संधीचा फायदा घेऊन उद्योजकांनी बांबूकडे वळणे गरजेचे आहे.

एलपीजी गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांची उद्योजकांसोबत महत्त्वपूर्ण बैठक होत आहे. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर बांबू लागवड चळवळीचे प्रणेते तथा महाराष्ट्र कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दूरध्वनीवरून त्यांच्याशी संपर्क साधून बांबू या विषयाचा बैठकीत प्रामुख्याने उल्लेख करावा आणि

उद्योजकांना या पर्यायाची माहिती द्यावी, अशी विनंती केली आहे. बांबू हा केवळ शेतीचा विषय नसून ते देशाच्या संरक्षणाचे आणि आर्थिक स्थैर्याचे इंधन ठरणार आहे, असा विश्वास डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

## मनपाचा कर वसुलीवर भर

### थकीत मालमत्ता कर भरण्याचे मनपाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहर महानगरपालिकेच्या कर विभागामार्फत शहरातील थकीत मालमत्ता करधारकांना तात्काळ कर भरण्याचे जाहीर आवाहन करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराची मागणी देयके सर्व संबंधित मालमत्ता धारकांना वितरित करण्यात आली असून, अद्यापही अनेक करदात्यांकडून कराची रक्कम प्रलंबित असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे थकीत कर त्वरित भरावा, अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा मनपा प्रशासनाने दिला आहे.




महानगरपालिकेच्या कर विभागाकडून शहरातील सर्व मालमत्ता करधारकांना चालू आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कराच्या मागणीपत्रिका देण्यात आल्या आहेत. या मागणीपत्रिकेनुसार करदात्यांनी आपला मालमत्ता कर नियोजित मुदतीत भरणे आवश्यक आहे. मात्र काही करदाते अद्यापही कराचा भरणा करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे थकीत कराची वसुली करण्यासाठी महानगरपालिकेने कठोर भूमिका घेतली आहे.

कर विभागाने केलेल्या आवाहनानुसार, ज्यांच्याकडे मालमत्ता कर थकीत आहे अशा सर्व करदात्यांनी तात्काळ महानगरपालिकेकडे कर जमा करावा. कर भरण्यासंदर्भात मागणीपत्रकात काही आक्षेप, दुरुस्ती किंवा शंका असल्यास संबंधित करदात्यांनी विलंब न लावता जालना शहर महानगरपालिकेशी संपर्क साधून आवश्यक माहिती घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे.

तसेच, वारंवार सूचना देऊनही जे करदाते कराचा भरणा करणार नाहीत, त्यांच्याविरोधात नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यात मालमत्ता जप्ती, सील करण्याची कारवाई किंवा इतर कायदेशीर उपाययोजना करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

महानगरपालिकेच्या महसुलाचा मोठा भाग मालमत्ता करातून मिळत असल्याने शहरातील मूलभूत सुविधा, विकासकामे आणि नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांसाठी या कराची वेळेवर वसुली अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे सर्व करदात्यांनी नागरिक म्हणून आपली जबाबदारी ओळखून थकीत मालमत्ता कर तात्काळ भरावा, असे आवाहन जालना शहर महानगरपालिकेच्या कर विभागाकडून करण्यात आले आहे

## मनपा प्रशासन जागे; रोडवरील बॅनर-बोर्ड हटविण्याची कारवाई सुरू

### दुकानाबाहेरील 'दुकाने' मात्र अजूनही कायम; नागरिकांचा सवाल, अतिक्रमणावर कधी होणार कठोर कारवाई?

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहरात रस्त्यांवर लावण्यात आलेल्या बॅनर-बोर्डविरोधात न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर अखेर जालना शहर महानगरपालिका प्रशासन जागे झाले असून शहरातील विविध भागांतून रस्त्यांवरील दुकानदारांचे बोर्ड आणि बॅनर हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. मात्र या कारवाईत केवळ बॅनर-बोर्ड काढण्यापुरतेच मर्यादित पाऊल उचलले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण अनेक ठिकाणी दुकानदारांनी दुकानातील विक्रीसाठीचे साहित्य थेट रस्त्यावर मांडून ठेवले असून 'दुकानाबाहेरील दुकाने' अजूनही कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेच्या पथकाने शहरातील प्रमुख रस्त्यांवरून बोर्ड-बॅनर काढण्यास सुरुवात केली आहे. मात्र शहरातील महावीर चौक ते जनार्धन मामा चौक, महावीर चौक ते टांगास्टॅण्ड मार्ग तसेच टांगास्टॅण्ड ते बसस्थानक या मार्गांवर अनेक दुकानदारांनी आपले साहित्य थेट रस्त्यावर ठेवलेले दिसून येते. कपड्यांचे गठ्ठे, भांडी-कुंडी, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स साहित्य तसेच इतर विक्रीचे सामान रस्त्याच्या कडेला किंवा फुटपाथवर मांडल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून पादचाऱ्यांनाही चालणे कठीण झाले आहे.

या परिस्थितीकडे मात्र महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. स्वच्छता निरीक्षक, अतिरिक्त आयुक्त तसेच सहाय्यक आयुक्त यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास ही बाब का येत नाही? असा सवालही उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानंतर महानगरपालिकेने बॅनर-बोर्ड हटविण्याची मोहीम सुरू केली असली तरी शहरातील अतिक्रमणाच्या मूळ समस्येकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी दुकानदारांनी आपले अर्धे दुकान थेट रस्त्यावरच उघडल्यासारखी परिस्थिती निर्माण केली आहे. यामुळे शहरातील वाहतूक कोंडी वाढत असून अपघाताचा धोका देखील निर्माण होत आहे.

जालना शहर स्वच्छ, सुंदर आणि सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मात्र शहरातील विविध समस्यांबाबत नागरिकांना वारंवार तक्रारी कराव्या लागत असल्याचे दिसून येते. अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांकडून अतिक्रमण, अस्वच्छता आणि वाहतूक अडथळ्यांबाबत तक्रारी केल्या जात असल्या तरी त्या तक्रारींवर कितपत आणि किती वेळेत कारवाई होते, याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



जालना शहर नगरपालिकेचेवतीने कोर्टाच्या आदेशानुसार रोडवर दुकानदाराचे बोर्ड व बॅनर काढण्यात आले (छायाचित्र किरण खानापुरे)

महानगरपालिकेकडे आतापर्यंत अतिक्रमण आणि रस्त्यांवरील अडथळ्यांबाबत किती तक्रारी प्राप्त झाल्या? त्या तक्रारींवर कोणती कारवाई करण्यात आली? किती अतिक्रमणे हटविण्यात आली? याचा सविस्तर लेखाजोखा जाहीर करण्याची मागणीही आता नागरिकांकडून होत आहे.

प्रत्येक वेळेस नागरिकांनीच तक्रारी कराव्यात, न्यायालयाचे दरवाजे ठोठवावेत किंवा लोकायुक्तांकडे धाव घ्यावी का? असा सवालही यानिमित्ताने उपस्थित होत आहे. शहरातील रस्ते मोकळे ठेवण्यासाठी आणि वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेने बॅनर-बोर्ड हटविण्याबरोबरच दुकानांबाहेरील अतिक्रमणांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## गॅस दरवाढीविरोधात नूतन वसाहत येथे काँग्रेसचे आक्रमक आंदोलन

**जालना । प्रतिनिधी** - जालना कांग्रेस कमिटी चे शहराध्यक्ष अतिक खान यांच्या नेतृत्वात आज दिनांक १२ गुरुवार रोजी दुपारी दोन वाजता जालना शहरातील नूतन वसाहत परिसरात गॅस दरवाढीच्या निषेधार्थ जालना जिल्हा व शहर कांग्रेस कमिटीने आंदोलन केले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी हातात गॅस सिलेंडर घेऊन भाजप सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

शासनाने घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात तब्बल ६० रुपयांची तर व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात ११५ रुपयांची वाढ झाली केली. या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, गृहिणी आणि छोट्या-मोठ्या व्यावसायिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे.

या आंदोलनात काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी यावेळी इशारा देत सांगितले की, गॅस दरवाढ तात्काळ मागे घेण्यात आली नाही तर येत्या काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल.

यावेळी काँग्रेस पक्षाच्या वतीने जालना जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आली की महागाईने सर्वसामान्य जनतेचे जगणे आधीच कठीण झाले असताना केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने एलपीजी गॅसच्या किमती वाढवून सामान्य जनतेची लुट करत आहे. डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वाखाली युपीए सरकारने आंतरराष्ट्रीय बाजारात गॅसच्या किमती वाढल्या तरी त्याचा बोजा सामान्य जनतेवर पडू दिला नाही, सबसीडी देऊन जनतेला महागाईचे चटके बसू दिले नाहीत. युपीए सरकारच्या काळात घरगुती सिलेंडर ४०० रुपयाना पान २ वर



युवा आदर्श

छिद्रान्वेशी ...

छिद्र दिसताचं जरा
भगदाडे मोठी करा
छिंद्रान्वेशी प्रवृत्तीने
पातकांचा घडाभरा
शोधून काढा लफडे
यायला हव्या चकरा
बळी द्यावा सहजते
कायम शोधा बकरा
सातत्ये प्रयास असो
खोटारडा वाटे खरा
हरवायचे जर दुजास
जाणावा भाग दुखरा
सत्तेचे लालची दाणे
मोह दाखवा पाखरा
करालं युक्ती क्लृप्ती
रत्ने लावालं मखरा
पायथ्या भले विसरा
स्पर्श करता शिखरा
ढासळे सत्ता डोलारा
इथे न चालेलं नखरा

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

# संपादकीय पान

## सर्वसामान्यांच्या स्वयंपाकगृहात युद्धाची धग

अमेरिका आणि इराण या देशांनी इराणवर केलेल्या बारा दिवस उलटले तरी हे थांबायचे नाव घेत नाही. हे जरी आखातात सुरू असले तरी त्याची झळ जगाला बसणार असे मी माझ्या जगाला झळ या लेखात लिहिले होते. या झळ जगाला जशी बसतेय तशीच भारतालाही बसत आहे आणि या धगीत देशातील सर्वसामान्य नागरिकांची ससेहोलपट होत आहे. या धग आता भारतीयांच्या स्वयंपाक घरांमध्येही बसू लागली आहे. इराण अमेरिका देशात गॅस तुटवडा निर्माण झाला असल्याने गॅस वितरक कंपन्यांच्या कार्यालयांपुढे नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. स्वयंपाकाचा गॅस ही जीवनावश्यक गरज आहे. जर हे आणखी काही दिवस चालले तर स्वयंपाकाला गॅस मिळणार नाही अशी भीती सर्वसामान्य नागरिकांमध्ये पसरली झाली असल्याने जो तो गॅस मिळवण्याचा प्रयत्न करत आहे त्यासाठी तासंतास रांगेत उभे राहून गॅस पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करीत असले तरी टीव्ही वरील बातम्या पाहून सर्वसामान्यांच्या चिंतेत भरच पडत आहे. त्यात सरकारने गॅसच्या दरात रुपये इतकी घसघशीत दरवाढ केल्याने भविष्यात गॅसचे दर आणखी वाढेल अशीही भीती निर्माण झाली आहे. सरकारने घरगुती गॅसला प्राधान्य देण्यासाठी व्यावसायिक सिलेंडरचे बुकिंग थांबवले आणि एकंदर बुकिंगची मुदत ते दिवसांवर नेण्यात आली त्यामुळे नागरिकांच्या घबराटीत भरच पडली आणि सगळीकडून एकाच वेळी नोंदणीचे सत्र सुरू झाले. एकाच वेळी सगळीकडून नोंदणी होऊ लागल्याने नोंदणीत अडचणी येऊ लागल्या त्यामुळे नागरिक आणखी हवालदिल झाले. सर्वसामान्य नागरिक घरगुती गॅस मिळत नसल्याने हवालदिल झाले आहेत तर व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा सरकारने बंद केला असल्याने हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेलला टाळे लावण्याची वेळ आली आहे. हॉटेल बंद झाल्यास त्यावर उपजीविका करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. घरगुती गॅस प्रमाणेच सिनजी गॅसचाही तुटवडा जाणवू लागल्याने सीएनजी पंपावर रिक्षा आणि वाहनांच्या देशखील रांगा पहायला मिळत आहे. गॅस तुटवड्यामुळे काही कंपन्यांनी आपले कामकाज बंद केले आहे एकूणच या देशातील नागरिक हैराण झाले आहेत. अर्थात हे होणारच होते याची पूर्व कल्पना सर्वांनाच होती. अमेरिका आणि अमेरिकेचे मित्र राष्ट्र असलेल्या देशांचे नाक दाबण्यासाठी इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद केली त्यामुळे त्यामार्गे भारतात येणारे इंधन पुरवठा थांबला. देशाच्या गरजेपैकी एलपीजी गॅस आपण आयात करतो आणि त्यातील एलपीजी हा आखाती देशातून हॉर्मुझमार्गे भारतात येतो. तो मार्ग बंद झाल्याने देशातील गॅस पुरवठा बाधित झाला आहे. हे होणार होते याची कल्पना सरकारलाही होती मात्र सरकारने राखीव साठा किंवा पुरेशी पर्यायी व्यवस्था न केल्याचेच हे परिणाम आहेत. हे कधी थांबेल हे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. हे आणखी काही दिवस चालले तर यापेक्षा भीषण परिस्थिती निर्माण होऊ शकते म्हणून सरकारने पर्यायी व्यवस्था आणि सुरळीत पुरवठा अशा दोन्ही आघाड्यांवर पावले उचलण्याची गरज आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

### पान १ वरुन

## गॅस दरवाढीविरोधात ...

मिळत होते, आता एका गॅस सिलेडरसाठी ९०० रुपयापेक्षा जास्त मोजावे लागत आहेत. सिलेंडर बुक करण्याचा कालावधीही १५ दिवसावरून एक महिन्याचा करण्यात आला आहे, यामुळे मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीही १९०० रुपयावर गेल्या आहेत.

तसेच या सिलेंडरचे रेशनिंग करण्यात येत आहे याचा मोठा फटका विद्यार्थी, कामगार, नोकरदार, ज्याची घरच्या जेवण्याची सोय नाही अशा लोकांना बसत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय वा व्यापारासाठी मोठ्या संख्येने लोकाना बाहेर जेवण करावे लागते, व्यावसायीक गॅसच्या किमती वाढवल्याने व त्याचे रेशनिंग केल्याने या खाद्यपदार्थांचे भावही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सर्वसामान्य जनता तसेच हॉटेल्स, खानावळी, खाद्य पदार्थ बनवणारे व बनवून विकणारे छोटे व्यावसायीक या सर्वांना गॅस सिलेंडर विना अडथळा सहजपणे उपलब्ध होईल याची व्यवस्था करावी. सरकारने वाढवलेल्या किमती तात्काळ कमी करावी अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अल्पसंख्यांक उपाध्यक्ष बदर चाऊस. शहराध्यक्ष अतिक खान, सेवादल जिल्हा अध्यक्ष इब्राहिम शेख. शेख शकील भाई. शेख वसीम भाई. रघुवीर गुडे, दिनेश सुराणा, अब्दुल अजीज, सूफियान कुरेशी, दिग्विजय धाड़गे, अमोल राजे भोसले. आसिफ पठाण. इखलास भाई. आदिल चाऊस सह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शालेय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारी ‘अग्निपंख’ शिष्यवृत्ती

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित राहून चालत नाही, तर त्यांच्यात विचारशक्ती, तर्कशक्ती, निरीक्षण क्षमता आणि आत्मविश्वास यांचा विकास होणे आवश्यक आहे. शालेय जीवनातच स्पर्धा परीक्षांची ओळख झाली तर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला योग्य दिशा मिळते. अशा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारी प्रेरणादायी शैक्षणिक चळवळ म्हणजे ‘अग्निपंख शिष्यवृत्ती परीक्षा’ होय.

ही शिष्यवृत्ती केवळ आर्थिक सहाय्य देणारी योजना नसून विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतेला जागृत करून त्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देणारी व्यापक व मूल्याधारित शैक्षणिक चळवळ आहे. महान शास्त्रज्ञ व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून ही योजना सुरू करण्यात आली आहे. डॉ. कलाम यांचा विश्वास होता की प्रत्येक बालक हे अथांग क्षमता आणि अमर्याद उर्जेचे केंद्र असते. योग्य मार्गदर्शन, संधी आणि प्रेरणा मिळाल्यास ही ऊर्जा यशस्वी आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नागरिकात रूपांतरित होऊ शकते.

‘अग्निपंख’ ही त्या विचारांची साकार रूपरेषा आहे. विद्यार्थ्यांच्या अंतःकरणातील शक्तीला




आत्मविश्वास, ज्ञान आणि संधीचे पंख देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ही शिष्यवृत्ती परीक्षा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या धर्तीवर तयार करण्यात आली असून यात विद्यार्थ्यांची तार्किक विचारशक्ती, विश्लेषण क्षमता, संकल्पनांची सखोल समज, बुद्धिमत्ता आणि निरीक्षण क्षमता यांचे मूल्यमापन केले जाते. ही परीक्षा केवळ गुणांची शर्यत नसून विद्यार्थ्यांच्या खऱ्या क्षमतांचा शोध घेणारी प्रक्रिया आहे.

या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, स्वप्ने पाहण्याची प्रेरणा मिळते आणि ध्येय साध्य करण्याची उमेद निर्माण होते. पुढे जाऊन विद्यार्थी एनडीए, आयआयटी-जेईई, नीट, एमपीएससी आणि यूपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठी सक्षम बनू शकतात. त्यामुळे शालेय जीवनात अशा परीक्षांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

‘अग्निपंख शिष्यवृत्ती परीक्षा’ ही इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणारी राज्यस्तरीय गुणवत्ताधारित शिष्यवृत्ती आहे. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा शोध घेऊन त्यांना योग्य दिशा, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देणे हा या शिष्यवृत्तीचा मुख्य हेतू आहे. विद्यार्थ्यांच्या सहभागानुसार शाळास्तर, तालुकास्तर आणि जिल्हास्तरावर विविध पारितोषिके दिली जाणार आहेत. तसेच इयत्तानिहाय मोठ्या प्रमाणावर शिष्यवृत्तीही देण्यात येणार आहे.

या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन कलाम्स् अग्निपंख इंटरनॅशनल फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने करण्यात येत आहे. परीक्षा दोन टप्प्यांत घेतली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात क्षमता चाचणीचा पेपर १ घेण्यात येईल, तर दुसऱ्या टप्प्यात शैक्षणिक व क्षमता चाचणीचा पेपर २ घेण्यात येईल. या परीक्षांमध्ये गणित, तर्कशक्ती, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि भाषा यांचा समावेश असून विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक क्षमता आणि संकल्पनात्मक समज तपासली जाणार आहे.

या शिष्यवृत्तीसाठी .. या वेबसाइटवर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया १५ फेब्रुवारी पासून सुरू झाली असून ३१ मार्च २०२६ ही अंतिम तारीख आहे. इयत्ता १ ते ४ साठी ३८५ रुपये आणि इयत्ता ५ ते ८ साठी ४८५ रुपये परीक्षा शुल्क ठेवण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९११२९११३८८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

एकूणच, ‘अग्निपंख शिष्यवृत्ती’ ही शालेय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारी, त्यांच्या सुप्त क्षमतेला दिशा देणारी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देणारी महत्त्वपूर्ण शैक्षणिक चळवळ ठरत आहे.

**- गंगाधर वानोळे**
**जि.प.प्रा.शाळा,पाटोदा ता.मंठा**
**७९७२९२१८६१**

# युद्धाचा आगडोंब, सर्वसामान्य गॅस...वर !

बँक एटीएमबाहेर रांगा. बँकेत नोटा काढण्यासाठी रांगा. तरुण, महिला, वृद्ध असे सर्व रांगेत लागलेले. तिथेच नाश्ता, जेवण आणि काहींना मरणही आले. नोटबंदीचा २०१६ चा तो काळ अजून तुम्ही विसरला नसाल. आता अमेरिका-इस्त्रायल यांनी इराणसोबत सुरू केलेल्या युद्धाचा आगडोंब उसळला. त्याच्या झळा आपल्या दारापर्यंत पोहोचू पोहोचू लागल्या आहेत. एलपीजी गॅस सिलिंडर आणि सीएनजीचा तुटवडा भारतात जाणवू लागला आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा पडल्यामुळे लोकांवर रांगा लावण्याची वेळ आली आहे. तब्बल दहा वर्षानंतर भारतीय नागरिक पुन्हा रांगेत उभा राहत आहे. घरात गॅस सिलिंडर नाही, काही शहरांमध्ये हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पुढील दोन दिवस पुरेल एवढाच गॅसचा साठा आहे. त्यामुळे लोकप लोक फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशभरात गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे राहत आहेत. दर वाढले तरीही सिलिंडर मिळत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. अजून पेट्रोलची मारामार सुरू झाली नाही, हीच त्यातल्या त्यात समाधानकारक बाब. अवघ्या ११ दिवसांच्या मध्यपूर्वेतील तणावामुळे आपल्या आत्मनिर्भरतेचा आत्मा गॅससारखा उडाला. भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा एवढ्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाला की केंद्र सरकारला जीवनावश्यक वस्तू नियंत्रण कायदा (एस्मा) लागू करावा लागला आहे. यामुळे कोणीही एलपीजी गॅस सिलिंडर, पेट्रोल, पेट्रोलियम पदार्थांचा साठा करू नये, त्याचा काळाबाजार होऊ नये, यासाठी सरकारला हा कायदा लागू करावा लागला आहे.

पेट्रोलियममंत्री हरदीपसिंग पुरी यांना भाजपचे पोस्टर बॉय खासदार तेजस्वी सूर सूर्या यांना गॅस पुरवठ्यासाठी पत्र लिहावे लागले आहे. सरकारची प्राथमिकता ही घरगुती गॅस सिलिंडरला आहे. त्यामुळे व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरवर अवलंबून असलेल्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः हॉटेल मालकांना, त्यांना थोडा धीर धरण्याचा सल्ला भाजपचे मंत्री आणि खासदार देत आहेत. भारतीय हे सहनशील आहेत, त्यामुळे ते आणखी काही काळ कळ सहन करतील. तसेही पंतप्रधान मोदींनी नोटबंदीमध्ये मला फक्त ५० दिवस द्या, असे म्हणत भारतीयांच्या सहनशक्तीची परीक्षा घेतली आणि त्यात भारतीय नागरिक पासदेखील झाले. पण त्यासाठी त्यांना किंमत मोजावी लागली. काहीजण रांगांमध्ये घेरी येऊन पडले. काहींचे हृदयविकाराने मृत्यू झाले. अमेरिका-इस्त्रायल या दोन्ही देशांनी मिळून इराणवर हल्ला चढवला. त्याला इराणही तेवढ्याच ताकदीने नसेल पण आपल्या पूर्णक्षमतेने आणि हिमतीने प्रतिकार करत आहे. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रासोबत लढताना इराणने आपली ताकद एकवटून अधिक कडवट प्रतिकार सुरू केला. त्याचाच भाग म्हणजे इराण आणि ओमान यांच्यादरम्यान असलेली होर्मुझ सामुद्रधुनी हा आखातातील तेलाचा जलमार्ग इराणने बंद करून आशियाई देशांचा गळाच दाबला आहे. सौदी अरेबिया, इराक, यूएई, कुवेत, कतार यांसारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांचा बहुतेक सर्व माल, क्रूड ऑईल होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे चीन, भारत, जपान आणि दक्षिण कोरिया यासह अनेक देशांना जातो. तो मार्गच बंद पाडल्यामुळे भारतात क्रूड ऑईल-कच्च्या तेलाची आयात कमी झाली, परिणामी एलपीजी आणि नैसर्गिक गॅसचा पुरवठा थांबला आहे. भारतातील मंत्री, राज्यकर्ते जेव्हा-जेव्हा सर्वकाही आटोक्यात आहे, सुरळीत आहे, असे म्हणतात तेव्हा समजून जायचे असते की परिस्थिती त्यांच्या हाताबाहेर गेली आहे. याचा अनुभव भारताने कोविड-१९ काळात घेतला. ते सर्व चीनमध्ये सुरू आहे, परदेशात होत आहे. त्याचा आपल्यावर काही परिणाम होणार नाही, अशी शेखी तेव्हाही मिरवली गेली आणि अचानक देशाला लॉकडाऊनमध्ये ढकलले गेले. संसदेमध्ये विरोधकांनी मध्यपूर्वेतील परिस्थितीवर चर्चेची मागणी केली, मात्र सरकारकडून ती फेटाळण्यात आली. भारत शांततेच्या बाजूने आहे, असे सांगत एस. जयशंकर यांनी सामान्य नागरिक जे रोज बातम्यांमध्ये पाहतो, ऐकतो आणि वाचतो तेच त्यांनी देशाच्या सर्वोच्च सभागृहात सांगितले. सरकार सभागृहात चर्चा करायला तयार नाही. देशाचे परराष्ट्र धोरण काय आहे, हे सांगायला तयार नाही. पंतप्रधान युद्ध सुरू होण्याच्या दोन दिवस आधी इस्त्रायलला जाऊन आले. इराणचे लढाऊ जहाज आपल्या देशात आले होते. राष्ट्रपतींना त्यांनी सलामी दिली. त्यातील एका जहाजाला मायदेशी परतताना अमेरिकेने जलसमाधी दिली. त्यानंतरही आपल्याकडून शोकना संदेश पाहाय पाहायला मिळाला. त्या युद्धनौकेबद्दल बोलायला परराष्ट्रमंत्री तयार नाहीत. भारताला रशियाकडून तेल खरेदीची परवानगी अमेरिका देते, भारताच्या सार्वभौमत्त्वाचे काय झाले, हा प्रश्न थोडावेळ बाजूला ठेवला तरी, रशियाकडून भारताने पेट्रोलियम पदार्थांची खरेदी केली की नाही, केली असेल तर भारतात इंधनाचा, गॅसचा प्रश्न का निर्माण झाला, हे कोणी सांगत नाही. गॅस तुटवड्यावर पेट्रोलियममंत्री समोर येऊन बोलायला तयार नाहीत. देशात किती तेल, गॅस साठा आहे, किती दिवस पुरेल सर्वकाही गुलदस्त्यात आहे. त्यामुळे सामान्य माणसाचे प्राक्तन हे फक्त रांगेत उभे राहणे. जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असल्याचा दावा करणारे, भारताला विश्वगुरूपद मिळवून देण्याची आशा दाखवणारे सगळेच आखाती युद्धामुळे गॅसवर गेले आहेत. मेक इन इंडियाचे दावे किती दुबळे आहेत, हे दिसत आहेत. हे थेट युद्ध आपल्याशी नसले तरी आपण बेजार झालो आहोत. या युद्धाचे भविष्य काय ते दिसेलच, पण एक देश म्हणून आपण किती परावलंबी आहोत, हे या युद्धाने दाखवून दिले आहे. आत्मनिर्भरतेचा फुगा फुटला आहे. यातून आपला भ्रम दूर व्हावा आणि आपल्या सरकारने देशाची स्थिती अधिक मजबूत करण्यावर भर द्यावा ही अपेक्षा.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले. मु.पो.मासा बेलेवाडी, कागल-कोल्हापूर.**

# विमा कंपनीला हायकोर्टाचा दणका; निष्कारण अपील केल्याबद्दल २ लाखांचा दंड

मुंबई उच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निकालात अपघातग्रस्ताला त्रास देण्याच्या हेतूने दाखल करण्यात आलेल्या निष्कारण अपीलाबाबत एका मोठ्या विमा कंपनीला चांगलाच दणका दिला आहे. न्यायालयाने केवळ विमा कंपनीचे अपील फेटाळून लावले नाही, तर पीडित व्यक्तीला खटल्याच्या खर्चापोटी २ लाख रुपये अतिरिक्त देण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे मोठ्या कंपन्यांकडून न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर करण्याच्या प्रवृत्तीवर कठोर संदेश गेला आहे.

या प्रकरणाची सुरुवात १८ नोव्हेंबर २०१४ रोजी झाली. त्या दिवशी एअर इंडियामध्ये केबिन क्रू म्हणून कार्यरत असलेले ५३ वर्षीय आदिल लुत्फी पीटर्स हे भीषण रस्ते अपघाताचे बळी ठरले. या अपघातात त्यांना १०० टक्के कायमस्वरूपी अपंगत्व आले. त्यामुळे त्यांचे व्यावसायिक तसेच वैयक्तिक आयुष्य पूर्णपणे विस्कळीत झाले. अपघातानंतर त्यांनी न्यायासाठी मोटार अपघात दावा न्यायाधिकरणात धाव घेतली. न्यायाधिकरणाने सर्व पुरावे, वैद्यकीय कागदपत्रे आणि साक्षीदारांचे जबाब तपासून पीडिताला २ कोटी ९७ लाख रुपयांची नुकसानभरपाई ७ टक्के व्याजासह देण्याचा आदेश दिला. मात्र या निर्णयाविरोधात एचडीएफसी ॲग्रो कंपनीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले.

विशेष म्हणजे, कंपनीने नुकसानभरपाईच्या रकमेवर आक्षेप घेतला नव्हता. त्यांनी केवळ पीडिताच्या साक्षीतील एका किरकोळ विसंगतीवर आक्षेप घेत संपूर्ण दावा खोटा असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. अपघातावेळी वाहनाने मागून धडक दिली की समोरून, या मुद्द्यावरूनच कंपनीने अपील दाखल केले होते. न्यायालयाने या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, मोटार अपघात कायद्यांतर्गत दाखल होणारे दावे हे ‘‘न्यायोचित भरपाई’’ देण्याच्या उद्देशाने असतात. या प्रकारचे खटले सारांश स्वरूपाचे असतात. त्यामुळे साक्षीतील किरकोळ विसंगती किंवा लहान चुका दाखवून पीडिताचा हक्क नाकारता येत नाही.

‘‘केवळ काही शंका किंवा अस्पष्टतेच्या आधारावर पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांना अनावश्यक त्रास होऊ नये, याची काळजी घेणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे,’’ असे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायालयाने विमा कंपनीने केलेले अपील अनावश्यक असल्याचे स्पष्ट करत ते फेटाळून लावले आणि पीडिताला अतिरिक्त २ लाख रुपये देण्याचे आदेश दिले.

या निर्णयावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. ते म्हणाले, ‘‘हा निकाल सर्वसामान्य नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारा आहे. अनेकदा मोठ्या विमा कंपन्या आपल्या आर्थिक ताकदीच्या जोरावर अपघातग्रस्तांना दीर्घकाळ न्यायालयीन प्रक्रियेत अडकवून ठेवतात. अपघातग्रस्त व्यक्ती आधीच शारीरिक, मानसिक आणि आर्थिक संकटात असते. अशा परिस्थितीत तिला न्यायालयीन प्रक्रियेत अडकवून ठेवणे अत्यंत अन्यायकारक आहे.’’

ते पुढे म्हणाले, ‘‘जालना जिल्ह्यासारख्या भागात अनेक अपघातग्रस्त शेतकरी आणि सामान्य नागरिक असतात. त्यांना विमा कंपन्यांकडून अनेकदा अशाच प्रकारचा त्रास दिला जातो. किरकोळ कारणे पुढे करून त्यांचे दावे नाकारले जातात किंवा कमी भरपाई देऊन प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला जातो. मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल आता जिल्हा पातळीवरील मोटार अपघात दावा न्यायाधिकरणांसाठी मार्गदर्शक ठरेल.’’ एका वरिष्ठ कायदेतज्ज्ञांनीही या निर्णयाचे स्वागत करत सांगितले की, न्यायालयीन प्रणाली ही न्याय मिळवण्यासाठी आहे, कुणाला त्रास देण्यासाठी नाही. एखादी मोठी कंपनी आपल्या आर्थिक आणि कायदेशीर ताकदीचा वापर करून सामान्य नागरिकाला दीर्घकाळ खटल्यांमध्ये गुंतवून ठेवते, तेव्हा ते न्यायाच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन ठरते. या प्रकरणात न्यायालयाने केवळ विमा कंपनीचे अपील फेटाळले नाही, तर पीडिताला २ लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम देण्याचा आदेश देऊन एक महत्त्वपूर्ण आदर्शही निर्माण केला आहे. या निर्णयामुळे अपघातग्रस्त आदिल पीटर्स यांना तब्बल ११ वर्षांनंतर न्याय मिळाला आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मते, हा निकाल केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून संपूर्ण न्यायव्यवस्थेसाठी सकारात्मक संदेश देणारा आहे. मोठ्या कंपन्यांना यामुळे स्पष्ट इशारा मिळाला आहे की, न्यायालयीन प्रक्रियेचा गैरवापर करून सामान्य नागरिकांना त्रास देण्याचे प्रकार आता खपवून घेतले जाणार नाहीत आणि असे करणाऱ्यांना त्याची किंमत मोजावी लागेल.

# सांस्कृतिक कलादर्पण नाट्य महोत्सवाचा दिमाखदार शुभारंभ

**मुंबई । प्रतिनिधी -** मराठी रंगभूमीच्या वैभवात भर घालणाऱ्या आणि नव्या प्रतिभेला व्यासपीठ मिळवून देणाऱ्या चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठान प्रस्तुत सांस्कृतिक कलादर्पण मराठी प्रायोगिक व व्यावसायिक नाट्य महोत्सवाचा शानदार शुभारंभ माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिर येथे पार पडला. दिग्गज कलाकार आणि नाट्यप्रेमींच्या उपस्थितीत या महोत्सवाचे दीपप्रज्वलन करण्यात आले. या महोत्सवातील प्रायोगिक नाट्य विभागाचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक-दिग्दर्शक देवेंद्र पेम यांच्या हस्ते झाले, तर व्यावसायिक नाट्य महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी मराठी चित्रपट आणि नाट्यसृष्टीतील नामांकित व्यक्तिमत्त्वांनी हजेरी लावून महोत्सवाचा उत्साह द्विगुणित केला. यामध्ये प्रामुख्याने सुप्रसिद्ध अभिनेता सुबोध भावे, ज्येष्ठ दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, अभिनेता शैलेश दातार, प्रतिमा कुलकर्णी, समीर खांडेकर, साईनाथ राजाध्यक्ष, सुनील जाधव, हेमंत भालेकर, प्रदीप साळे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच नाटकांच्या परीक्षणाची धुरा चोखंदळ परीक्षकांकडे सोपवण्यात आली आहे.

प्रायोगिक विभाग: राष्ट्रीय पुरस्कार विजेते रमेश मोरे, श्रीनिवास नार्वेकर, प्रकाश जाधव, ज्येष्ठ नाट्यव्यवस्थापक प्रभाकर (गोट्या) सावंत आणि शिरीष घाग.

व्यावसायिक विभाग: रमेश मोरे, संकेत तांडेल, रविंद्र आवटी, अमित फाटक आणि शिरीष घाग.




कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष चंद्रशेखर सांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. यावेळी उपाध्यक्ष सुनील खेडेकर, सचिव सुधीर सोमवंशी, संचालक तन्मय सांडवे, खजिनदार सर्वेश सांडवे, स्पर्धा प्रमुख विकास मोजर, विश्वस्त पद्माकर गांधी, सोशल मीडिया प्रमुख निखिल मालुसरे आणि स्वयंभू सांडवे यांनी सर्व पाहुण्यांचा यथोचित सत्कार केला. गणेश तळेकर, लव क्षीरसागर, नितीन पाटील, स्कंधा गांधी आणि पराग सारंग यांचे या महोत्सवाला मोलाचे सहकार्य लाभले आहे.

या महोत्सवात प्रेक्षकांना एकापेक्षा एक दर्जेदार नाटकांची पर्वणी मिळणार आहे. इतकेच नव्हे तर ह्या नाट्य महोत्सवात प्रत्येक नाटकाच्या प्रयोगाच्या अंती नाटक पाहायला येणाऱ्या सर्व प्रेक्षकांना संबंधित नाटकाबद्दल आपले परीक्षण नोंदवता येणार आहे आणि नाट्य महोत्सवाच्या अंतिम निकालासाठी आपले योगदान देता येणार आहे.

प्रायोगिक नाटके :१) इतना सन्नाटा क्यों है भाई ? २) ऊन पाऊस ३) कर्ण ४) स्वस्तिकाची ट्रजेडी ५) इथेच टाका तंबू ६) रेशनकार्ड.

व्यावसायिक नाटके :१) सविता दामोदर परांजपे २) फिल्टर कॉफी ३) ठरलंय ४) गोष्ट तिच्या घटस्फोटाची ५) लागली पैज,

आता होणार खेळ सुरू. हा महोत्सव १३ मार्च पर्यंत सुरू राहणार असून, सामान्य रसिक प्रेक्षकांना ही नाटके पाहता यावीत यासाठी तिकिटांचे दर अत्यंत माफक म्हणजे १००, २०० आणि ३०० रुपये ठेवण्यात आले आहेत. तिकिटे नाट्यगृहाच्या तिकीट खिडकीवर किंवा तिकिटालय ॲप व वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

नाट्यप्रेमींनी या कलाविष्काराचा आनंद घेण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चंद्रशेखर सांडवे प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र ज्ञान महामंडळच्या परीक्षेत तृतीय आलेल्या सोनम निकमला बक्षीस प्रदान



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या वतीने राज्यस्तरावर ऑलिंपियाड मोमेंट अंतर्गत अभिनव डाटा सर्व्हिसेसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेत संस्कार प्रबोधिनी विद्यालयाची विद्यार्थिनी सोनम अर्जुन निकम हिने जिल्ह्यातून तृतीय क्रमांक पटकावून यश संपादन केले आहे. या यशाबद्दल तिला नुकतेच बक्षीस आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

संस्कार प्रबोधिनी विद्यालयाच्या प्रांगणात हा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला संस्कार प्रबोधनी विद्यालय समितीचे अध्यक्ष सुरेश केसापूरकर, सचिव विजय देशमुख, संचालक विनायकराव देशपांडे, भास्करराव काळे आणि केसरसिंह बगेरिया यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी अभिनव डाटा सर्व्हिसेसचे प्रसन्ना जाफराबादकर यांनी प्रास्ताविक करताना महाराष्ट्र ज्ञान महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच, महामंडळाचे समन्वयक अमर देवळे यांनी या परीक्षेचे स्वरूप आणि विद्यार्थ्यांसाठी राबवल्या जाणाऱ्या इतर शैक्षणिक उपक्रमांवर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी विनायकराव देशपांडे यांनी जिल्हास्तरीय परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवल्याबद्दल सोनम निकमचे विशेष कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका श्रीमती रावस यांनी केले. मुखाधापिका रिमा पोळ यांनी आभार मानले.या सोहळ्याला अभिनव डाटा सर्व्हिसेसच्या सौ. रेखा जाफराबादकर, शिक्षिका श्रीमती पाठक, श्रीमती बोबडे, शिक्षक श्री. बोधक, श्री. मराठे यांच्यासह शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण प्लेसमेंट ड्राईव्ह; १३ मार्चला २२ जागांसाठी थेट मुलाखती

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे शुक्रवार, दि. १३ मार्च २०२६ रोजी विशेष प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत होणाऱ्या या मोहिमेत नामांकित संस्थांमध्ये रिक्त असलेल्या २२ पदांसाठी पात्र उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथे घेतल्या जाणार आहेत.

या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये प्रामुख्याने रेणुका देवी नागरी सहकारी बँक आणि गणपती नेत्रालय या सारख्या नामांकित संस्था सहभागी होत आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, नियुक्ती होणाऱ्या उमेदवारांना संबंधित कंपनीकडून मिळणाऱ्या वेतनाव्यतिरिक्त शासन निर्णयानुसार त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार ६ हजार, ८ हजार आणि १० हजार रुपयांपर्यंतचे मासिक विद्यावेतन देखील दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीला येण्यापूर्वी राज्य शासनाच्या .... किंवा केंद्र शासनाच्या ... या पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. लॉगिन केल्यानंतर डॅशबोर्डवरील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना प्लेसमेंट ड्राईव्ह या टॅबवर क्लिक करून जालना जिल्ह्याची निवड करावी आणि संबंधित पदांची माहिती घ्यावी.असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ अभियानाचे आयोजन

# मार्च ते मे २०२६ दरम्यान विविध मंडळांत शिबिरे नागरिकांच्या महसुली तक्रारींचे तातडीने निराकरण

**जालना । प्रतिनिधी** - राज्य शासनाच्या आदेशानुसार जालना तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्र. १ राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांच्या महसुली संबंधित अडचणी व तक्रारींचे तातडीने निवारण करण्यासह विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

या शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेअंतर्गत नोंदी अद्ययावत करणे, डिजिटल सेवा पोर्टलवरील प्रकरणांचा निपटारा

तसेच सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी अंतर्गत सेवा देण्यात येणार आहेत. मार्च ते मे २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध मंडळांमध्ये ही शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमानुसार १४ मार्च रोजी जालना तालुक्यातील सावंगी तलाव मंडळात निरखेडा रामेश्वर मंदीर येथे, बदनापूर तालुक्यात रोशेगाव मंडळात शिवाजी विद्यालय रोशेगाव येथे, अंबड तालुक्यातील धनगरपिंप्री मंडळात मंगल कार्यालय धनगरपिंप्री येथे, घनसावंगी तालुक्यात राणीउंचेगाव मंडळात शारदा

मंगल कार्यालय राणी उंचेगाव येथे, परतूर तालुक्यात श्रीष्टी मंडळात जि.प.शाळा श्रीष्टी येथे, मंठा तालुक्यात तळणी मंडळात जि.प.शाळा तळणी येथे, भोकरदन तालुक्यात जानेफळ दाभाडी मंडळात महादेव मंदीर जानेफळ दाभाडी येथे, आणि जाफ्राबाद तालुक्यातील कोळेगाव मंडळात जि.प.शाळा भारत बु. येथे हे शिबिर सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहावे,

असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.







उन्हाळ्याची चाहूल लागताच गरिबांचा फ्रिज बाजारात दाखल झाला असून महिला भगिनी खरेदी करताना दिसत आहे (छायाचित्र किरण खानापुरे)

## रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर परतूर येथील ईदगाह मैदान स्वच्छतेची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** पवित्र रमजान महिन्याचा शेवट जवळ आला असून मुस्लिम बांधवांचा मोठा सण असलेल्या ईद-उल-फित्रच्या नमाजासाठी परतूर येथील ईदगाह मैदानावर मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र येतात. या पार्श्वभूमीवर ईदगाह मैदानाची तात्काळ स्वच्छता करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पत्रकार सय्यद वाजेद यांनी नगरपालिकेकडे केली आहे.

ईदच्या दिवशी हजारो मुस्लिम बांधव ईदगाह मैदानावर नमाज अदा करण्यासाठी येत असतात. त्यामुळे मैदान परिसर स्वच्छ, सुस्थितीत व सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या मैदान परिसरात गवत, कचरा व अस्वच्छता दिसून येत असल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.



यामुळे नगरपालिकेने त्वरित लक्ष देऊन मैदानाची साफसफाई करावी, कचरा हटवावा तसेच पिण्याच्या पाण्याची आणि इतर आवश्यक सोयीसुविधांची व्यवस्था करावी, अशी मागणी पत्रकार सय्यद वाजेद यांनी केली आहे.

ईद सण शांततेत आणि आनंदात साजरा व्हावा यासाठी प्रशासनाने वेळेत योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# प्लॉटच्या वादातून चाकूहल्ला

## एकाचा मृत्यू, एक जखमी

**परतूर । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील गुळखंड तांडा येथे प्लॉटच्या वादातून झालेल्या मारहाणीत एका व्यक्तीचा चाकूने वार करून खून करण्यात आल्याची घटना बुधवारी (ता.११) सकाळी घडली. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अलका नवनाथ राठोड (वय २५, रा. गुळखंड तांडा, ता. मंठा, जि. जालना) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास गुळखंड तांडा येथील वादग्रस्त मोकळ्या प्लॉटवर हा प्रकार घडला. फिर्यादीचे सासरे भाऊसाहेब रावसाहेब राठोड हे प्लॉटच्या वादाबाबत आरोपींशी बोलत असताना आरोपींनी गैरकायद्याची जमावबंदी करून हातात चाकू, लाठ्या व दगड घेऊन शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. आरोपी रावसाहेब सिताराम राठोड यांनी इतरांना "याला धडा शिकवा" असे सांगितल्याने सर्वांनी मिळून भाऊसाहेब राठोड यांना मारहाण केली.

त्यावेळी आरोपी साईनाथ रावसाहेब राठोड याने चाकूने भाऊसाहेब राठोड यांच्या पोटात वार करून गंभीर जखमी केले. दरम्यान आवाज ऐकून फिर्यादीचे पती नवनाथ भाऊसाहेब राठोड हे भांडण सोडवण्यासाठी आले असता आरोपी संतोष रावसाहेब राठोड व सोहम संतोष राठोड यांनी "यालाही जिवंत सोडू नका" असे म्हणत नवनाथ राठोड यांच्यावरही पोट, पाठ व मांडीवर चाकूने वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

तसेच भांडण सोडवित असताना आरोपी विराट साईनाथ राठोड याने फिर्यादी अलका राठोड यांच्या उजव्या हातावर काठीने मारहाण केली. तर भांडण सोडविण्यासाठी आलेल्या सुरेखा एकनाथ राठोड यांच्यावर आरोपी स्तिष संतोष राठोड यांनी दगड फेकून मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर गावकऱ्यांनी जखमींना उपचारासाठी कलावती हॉस्पिटल, जालना येथे नेले असता डॉक्टरांनी भाऊसाहेब रावसाहेब राठोड यांना तपासून मृत घोषित केले.

या प्रकरणी पोलिसांनी आरोपी रावसाहेब सिताराम राठोड, साईनाथ रावसाहेब राठोड, संतोष रावसाहेब राठोड, सोहम संतोष राठोड, स्तिष संतोष राठोड, विराट साईनाथ राठोड, वंदना साईनाथ राठोड व संगिता संतोष राठोड (सर्व रा. गुळखंड तांडा, ता. मंठा, जि. जालना) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक वैद्य करत आहेत

# पांगरी खुर्द येथे अतिक्रमण नोटीसवरून वाद; ग्रामस्थांची पंचायत समितीकडे धाव

मंठा । प्रतिनिधी - मंठा तालुक्यातील पांगरी खुर्द येथे राहत्या घरावर अतिक्रमण केल्याचा ठपका ठेवत ग्रामपंचायतीने दिलेल्या नोटीसमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून संबंधित ग्रामस्थांनी पंचायत समिती मंठा येथे गटविकास अधिकाऱ्यांकडे धाव घेत चौकशीची मागणी केली आहे.

पांगरी खुर्द येथील दत्ता चव्हाण, कानबा काळे, विलास काळे, प्रकाश काळे, एकनाथ काळे व शेषराव काळे यांनी दिलेल्या अर्जात नमूद केले आहे की, ते सर्वजण गेल्या ४० ते ४५ वर्षांपासून आपल्या वडिलोपार्जित जागेवर राहत्या घरासह वास्तव्यास आहेत. मात्र ३ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायत पांगरी खुर्द येथील सरपंच व ग्रामसेवकांनी संबंधित जागेवर अतिक्रमण केल्याचे नमूद करत अतिक्रमण हटविण्याची नोटीस बजावली.

ही नोटीस अन्यायकारक व बेकायदेशीर असल्याचा आरोप करत, संबंधित जागेवर आमचे राहते घर असून अनेक वर्षांपासून आम्ही तेथे वास्तव्यास असल्याचे ग्रामस्थांनी अर्जात स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून आम्हाला न्याय द्यावा व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अर्जदारांनी केली आहे.

या प्रकरणामुळे पांगरी खुर्द गावात चर्चेला उधाण आले असून प्रशासन काय भूमिका घेते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



## अ.भा. लोकहित महासंघाची स्थापना

**जालना । प्रतिनीधी -** सामाजीक कार्यकर्ते शेख चाँद पी.जे. व वसीम खान यांच्या वतीने सर्वसामान्यांचे हित जोपासण्यासाठी वेळेप्रसंगी त्यांच्या न्याय हक्काकरीता लढा उभारण्यासाठी अखिल भारतीय लोकहित महासंघाची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये अध्यक्षपद शेख चाँद पी.जे. तर कार्याध्यक्ष पद वसीम खान भुषवीणार आहेत. लवकरच जालना शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये महासंघाची बांधणी करून प्रभाग निहाय, शहर व तालुका, जिल्हा कार्यकारीणींची घोषणा करण्यात येईल. या कार्यकारीणीमध्ये सर्व घटकातील, सर्व जातीधर्मातील, महिला, पुरूष, युवक, कामगार, व्यवसायीक, विद्यार्थी यांना सामावुन घेण्यात येईल. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फु ले, ह. टिपु सुलतान तसेच महाराष्ट्रातील संताच्या मार्गदर्शनाखाली भारताच्या संविधानाने नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत हक्क, मानवी हक्क व कायदेशीर अधिकारांचे संरक्षण, संवर्धन व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्य करण्यात येणार असल्याचे महासंघाने जाहिर केले आहे. जालना जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर महासंघासोबत जुडण्याचे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आलेले आहे.





# नृत्यातून उलगडला शिव-शक्तीचा दैवी आविष्कार

## मृगनयनी भगिनींच्या पदलालित्याने जालनेकर रसिक मंत्रमुग्ध; 'कलावर्धिनी'चा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** येथील कलावर्धिनी ग्रुपच्या वतीने आयोजित शिवशक्ती-समरस्यम या भरतनाट्यम नृत्य सादरीकरणाने जालनेकर रसिकांना एका आध्यात्मिक आणि कलात्मक प्रवासाची प्रचिती दिली. प्रसिद्ध नृत्यांगना ईशिता आणि ईशानी कुलकर्णी (मृगनयनी भगिनी) यांनी आपल्या बहारदार सादरीकरणातून शिव आणि शक्तीची विविध रूपे रंगमंचावर जिवंत केली. जेईएस महाविद्यालयाच्या चुन्नीलालजी गोयल सभागृहात हा अविस्मरणीय सोहळा पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात 'श्री विघ्न राजम भजे' या गणेश वंदनेने झाली. सगुण ते निर्गुण अशा प्रवासाचा वेध घेत मृगनयनी भगिनींनी 'अलारिपु' आणि 'नर्मदा जतीस्वरम' सादर केले. नर्मदा नदीचा उगम आणि तिचा जीवनप्रवाह एखाद्या स्त्रीच्या जीवनप्रवासासारखा भासत असल्याचे नृत्यातून प्रभावीपणे मांडण्यात आले. त्यानंतर ईशिता कुलकर्णी हिने देवी पार्वतीचे स्वरूप असणारे

'उच्छिष्ट चंडालीनी' हे एकल नृत्य सादर केले, तर ईशानी कुलकर्णी हिने भगवान शिवाच्या स्तुतीपर 'शंकर श्री गिरी नाथ प्रभू' या हिंदी रचनेवर नेत्रदीपक पदलालित्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः शिव आणि पार्वतीच्या सृष्टी सृजनत्वाचे प्रतीक असलेल्या 'अर्धनारीश्वर' नृत्याने प्रेक्षकांना एका अद्भुत आणि दैवी आविष्काराचा अनुभव दिला. कार्यक्रमाची सांगता 'तिल्लाना' ने करण्यात आली.



कार्यक्रमाचा प्रारंभ कलवर्धिनीचे सदस्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. सुजाता देवरे, गुरु डॉ. व्ही. सौम्याश्री आणि विद्या राव यांच्या हस्ते नटराज पूजनाने झाला. याप्रसंगी शाहीर आप्पासाहेब उगले, डॉ. यशवंत सोनुने, शाहीर रामानंद उगले, शिवकुमार बैजल, प्रा. कल्याण उगले यांसह कलवर्धिनीचे सदस्य व रसिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुलभा कुलकर्णी यांनी नृत्यांगनांचे स्वागत केले, तर सूत्रसंचालन शाहीर माधवी माळी यांनी केले.

**विशेष आकर्षण: नृत्यातून वाहणारी नर्मदा**

कार्यक्रमातील नर्मदा जतीस्वरम हे सादरीकरण रसिकांच्या विशेष पसंतीस उतरले. अमरकंटक येथील नर्मदा नदीचा उगम आणि तिचा खळाळता प्रवास मृगनयनी भगिनींनी आपल्या मुद्रांमधून असा काही साकारला की, जणू रंगमंचावर प्रत्यक्ष

जलप्रवाह वाहत असल्याचा भास निर्माण झाला. एका स्त्रीचा जन्म, तिचे बालपण आणि तिचा प्रगल्भ जीवनप्रवास याचे सुंदर रूपक या नृत्यातून उलगडले गेले.

## बाबासाहेब शेळके यांना स्वप्नल फाऊंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** शिवछत्रपती वनश्री पुरस्कार प्राप्त अंबड तालुक्यातील डोमेगाव येथील बाबासाहेब शेळके यांना उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल पुणे येथील स्वप्नल फाऊंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

बाबासाहेब शेळके हे डोमेगाव ग्रामपंचायत मध्ये पाणी पुरवठा कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत. गावात स्वखर्चाने २२५ शौचालय बांधण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. याशिवाय गावात हरीत क्रांती घडविण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली आहे. गावातील नदीवर बंधारा बांधून त्यांनी पाणी टंचाई कमी करण्यासाठी हातभार लावला आहे.

गावातील एका मानसिक आजार जडलेल्या तरुणाचा वैद्यकीय खर्चही त्यांनी उचलला आहे. सातत्याने सामाजिक उपक्रम राबविणारे बाबासाहेब शेळके यांनी शिवजयंती दिनी गावातील प्रल्हाद निंबाजी म्हसके व छबुबाई प्रल्हाद म्हसके या निराधार दाम्पत्यास प्रतिमहिना १ हजार रुपये व रेशन या दाम्पत्यास देण्याचा संकल्प केला आहे. डोमेगाव येथील व्यसनाधीन व्यक्तीला बाबासाहेब शेळके व सविता शेळके ह्या समुपदेशन करून व्यसनमुक्त करीत आहेत.



बाबासाहेब शेळके यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना पुणे येथील स्वप्नल फाऊंडेशनने राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे.२३ मार्च रोजी पुणे महानगर पालिकेच्या सावित्रीबाई फुले सांस्कृतिक केंद्रात शेळके यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. याच स्वप्नल फाऊंडेशनने बाबासाहेब शेळके यांच्या पत्नी सविता शेळके यांनाही पुरस्कार जाहीर केला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.